<u>सं. फौ. ख. क्र.८५९/२०२१</u>　　　　　　　　　　निशाणी ३०

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – संजय सुखदेव वानखडे

वय – ५५ वर्षे,　　　　　　　　　व्यवसाय – सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. खदान, अकोला

पत्ता – रा. गिता नगर, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी उरळ पो.स्टे. येथे सन २०१४ ते २०२१ या कालावधीमध्ये पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. दि.२७.०१.२०२१ रोजी अपराध क्र.२५/२०२१, भादंवि कलम २७९, ३०४–अ या गुन्ह्याचा तपास माझ्याकडे वरीष्ठांच्या आदेशाने वर्ग करण्यात आला होता. सदर तपासकामी माझ्याकडे एफआयआर प्रत, जबानी रिपोर्ट इ. कागदपत्र प्राप्त झाले होते. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर गुन्ह्यातील आरोपीने त्याचे टाटा एस कंपनीचे वाहन क्र.एमएच३०/एबी/०५९४ हे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे बाकराबाद या गावातील रस्त्याच्या येथे पाठी घेत असताना त्यामध्ये फिर्यादीचे वडील रायभान माळी हे गाडीच्या पाठच्या चाकाखाली आले व त्यामुळे त्यांना गंभीर दुखापत होवून ते मयत झाले.

२. सदर तपासकामी मी दोन पंचांसमक्ष घटनास्थळी गेलो त्या ठिकाणी अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला होते तसेच त्या वाहनाच्या मागील चाकाखाली मृतक रायभान माळी यांचे प्रेत जखमी अवस्थेमध्ये पडले होते. त्यांना डाव्या व उजव्या कानाच्या येथे जखम झाली होती तसेच छातीवर देखील जखम झाली होती. तसेच दोन्ही खांद्याला देखील जखमा झाल्या होत्या. सदर घटनास्थळाचा दिसत्या परिस्थितीचा मी घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला नि.क्र.१८ कडील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर दोन पंचासह माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

३. मृतकाच्या नातेवाईक व पंचांना नोटीस दिल्या. आता मला सदर नोटीस दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून मयताचे नातेवाईक व पंचांच्या सह्या असून

त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३१** देण्यात येत आहे. सदर घटनास्थळ पंचनामा केल्यानंतर मी मयत रायभान माळी यांच्या प्रेताचा दोन पंचांसमक्ष मरणोत्तर पंचनामा केला. आता मला नि.क्र.१७ कडील मरणोत्तर पंचनामा दाखविण्यात आला त्यावर दोन पंचासह व माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

४. सदर मयत इसमाचे प्रेत शवविच्छेदन करणेकामी अकोला येथील सरकारी रुग्णालयात पाठविले. त्यानंतर मयताचे शवविच्छेदन होणेकामी माझ्या सहीचे दि.२७.०१.२०२१ रोजीचे पत्र दिले. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३२** देण्यात येत आहे. त्यानंतर आरोपीस व अपघातातील वाहन हे पो.स्टे.ला आणले. आरोपीचा चेहरापट्टी फॉर्म भरुन घेतला व त्यास समजापत्रावर सोडले. आता मला सदर चेहरापट्टी फॉर्म व समजापत्र दाखविण्यात आले त्यावर माझी व आरोपीची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३३ व ३४** देण्यात येत आहे.

५. त्यानंतर जिल्हा अपघात प्राधीकरण विभाग, अकोला येथे माझ्या सहीचे दि.२३.०२.२०२१ रोजीचे पत्र दिले व सदर अपघाताबाबतची माहिती दिली. आता मला सदरचे पत्र व विहीत नमुन्यातील फॉर्म दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३५ व ३६** देण्यात येत आहे. त्यानंतर उप प्रादेशिक वाहन अधिकारी, अकोला यांना माझ्या सहीचे पत्र देवून सदर अपघातातील तांत्रीक तपासणी होवून मिळण्याकामी विनंती केली. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३७** देण्यात येत आहे.

६. सदर पत्राच्या अनुषंगाने उप प्रादेशिक वाहन अधिकारी यांनी अपघातातील वाहन याची तांत्रीक तपासणी करुन त्याबाबत अहवाल त्यांनी दिला. आता मला सदर अहवाल दाखविण्यात आला त्यावर संबंधित अधिकाऱ्यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३८** देण्यात येत आहे. (सदर निशाणी देण्यास बचाव पक्षाची हरकत नाही.)

७. सदर तपासकामी अपघातातील मयताचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त केला. आता मला सदरचा शवविच्छेदन अहवाल दाखविण्यात आला, तो तोच आहे. सदर अहवाल बचाव पक्षाने मान्य केला आहे. त्यास **नि.क्र.३९** देण्यात येत आहे. त्यानंतर फिर्यादी व साक्षीदार यांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले तसेच अपघातातील वाहनाचे कागदपत्र इन्शुरन्स, आर.सी. बुक व वाहन चालविण्याचा परवाना प्राप्त केला त्यास **आर्टीकल अ** देण्यात येत आहे. सदर गुन्हामध्ये जप्त केलेले वाहन हे रु.१००/– च्या बंधपत्रावर वाहन मालक प्रमोद माळी यांना दिले. आता मला सदर बंधपत्र दाखविण्यात आले, ते तेच आहे. त्यास **नि.क्र.४०** देण्यात येत आहे. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्याच्या विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात असल्याबाबत साक्षीदार यांनी सांगितले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. एन. जामोदे यांचे मार्फत उलटतपासः</u>**

८. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचांना मी लेखी नोटीस दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा मी पो.स्टे. येथे बसून तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मरणोत्तर पंचनामा देखील मी पो.स्टे. येथे तयार केला व त्यावर पंचांच्या सह्या पो.स्टे. येथे घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांचे जबाब हे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंद केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर गुन्ह्यातील साक्षीदार हे मयताचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अपघातातील वाहन हे मयत यांच्या नातेवाईकांचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे तथाकथित वाहन हे आरोपी घटनेच्या दिवशी चालवित नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मयत हा घटनेच्या दिवशी चक्कर येवून खाली पडला व त्यामुळे त्यास जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी खोट्या फिर्यादीवरुन सदर गुन्ह्याचा चुकीचा तपास केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दोषारोप पत्र सोबत जे जे कागदपत्र लावलेले आहेत, ते मी स्वतः तयार केलेले आहेत, व त्यावर संबंधित अधिकारी यांच्या सह्या आणलेल्या आहेत.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– २७.०२.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.02.27 15:55:00 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २७.०२.२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २७.०२.२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २७.०२.२०२६ |